# आशा

व्यतीतात नसतील जर बीजे आयातीची
अतीतात नसतील जर चिह्ने भविष्याची
असणार नाही कधी निश्चितीच सातत्याची
जन्मच घेईल का कधी मग आई आशेची

वर्तमानातच घडे जरी जन्म भविष्याचा
सामर्थ्य असे आशेत आकार त्याला देण्याचा
भूत भोगूनी निपजे प्राणी मनी उत्सुकता
पोटी तिच्याच जन्मे आशा जी जीवन प्रेरणा

भूत भविष्य वर्तमान काळ तीन कल्पित
प्रत्यक्षात करीते मात्र आशाच त्यांना सार्थ

– नारायण
०९/३०/२३